पुण्य नगरी
कोल्हापूर । गुरूवार,२६ फेब्रुवारी २०२६



# साहित्याकडे डोळसपणे पाहा

## प्रा. शिंदे; 'विवेकानंद 'मध्ये युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा साहित्य संमेलन घेणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव महाविद्यालय आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लिहिलेली दैनंदिनी प्रमाण मानून विद्यार्थ्यांनीही दैनंदिनी लिहिली पाहिजे आणि हीच साहित्य लेखनाची सुरुवात असते. मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विकसित होते. विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जनशीलतेला व सृजनशीलतेला वाव मिळतो. साहित्याकडे डोळसपणे पाहण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व समीक्षक प्रा. रणधीर शिंदे यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षीय मनोगतात कौस्तुभ गावडे म्हणाले, कोल्हापूर नगरीने महाराष्ट्राला अनेक साहित्यरत्ने दिली आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हेसुद्धा साहित्यिक होते. बापूजींनी लिहिलेल्या प्रार्थनेतून मानवतावादी विचार प्रकट होतात.

संमेलनाच्या प्रथम सत्रात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक किरण गुरव यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. प्रा. सतीश उपळावीकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. इरफान मुजावर यांनी कविता सादर केल्या.

संमेलनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसर ते ग्रंथालय या मार्गावरील ग्रंथदिंडीने टाळ व मृदंगाच्या गजरात झाली. प्रास्ताविक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. अविनाश गायकवाड व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी केले. संमेलनाचे आयोजन डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे, डॉ. शुभांगी काळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. ए. एस. महात, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. सनी काळे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी केले.

# मातृभाषा विकासासाठी वाचन, लेखन हवे

## प्रा. डॉ. रणधीर शिंदे : 'विवेकानंद'मध्ये आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेत व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे. मातृभाषेच्या विकासाचे बाळकडू शैक्षणिक प्रक्रियेत विकसित होते. साहित्याकडे डोळसपणे पाहण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे,' असे प्रतिपादन लेखक व समिक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्‌मय मंडळ व 'आयक्युएसी' यांच्यातर्फे पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते.




कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनात बोलताना प्रा. रणधीर शिंदे. सोबत कौस्तुभ गावडे व इतर मान्यवर.

डॉ. शिंदे म्हणाले, 'आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवा साहित्य संमेलन घेणारे विवेकानंद कॉलेज हे एकमेव महाविद्यालय आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य, नातेसंबंध, व्यावसायिक मूल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक योगदान यावर विद्यार्थ्यांनी गंभीर विचार करण्याची आवश्यकता आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी लिहिलेली दैनंदिनी प्रमाण मानून विद्यार्थ्यांनीही दैनंदिनी लिहिली पाहिजे आणि हीच साहित्य लेखनाची सुरुवात असते.'' संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाचे आयोजन केले होते. प्रथम सत्रात किरण गुरव यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. दुसऱ्या सत्रात कवी विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली युवा कवी संमेलन झाले. प्रा. सतीश उपळावीकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. इरफान मुजावर यांनी कविता सादर केल्या. संमेलनाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसर ते ग्रंथालय या मार्गावरील ग्रंथदिंडीने टाळ व मृदंगाच्या गजरात झाली. समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. अविनाश गायकवाड व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी सूत्रसंचालन केले. स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी श्रावणी पाटील हिने मनोगत व्यक्त केले. डॉ. कविता तिवडे, डॉ. दीपक तुपे, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. नीता पाटील, हितेंद्र साळुंखे, डॉ. शुभांगी काळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. ए. एस. महात, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. सनी काळे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी संयोजन केले.

### नवोदितांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, ''धावपळीच्या जीवनात आयुष्याला उभे करण्यासाठी माणूस सतत संघर्ष करीत आहे. हा संघर्ष साहित्यातून चित्रित होतो. त्यासाठी युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा युवा साहित्य संमेलनांची आवश्यकता असते.'

सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार,
२६ फेब्रुवारी २०२६/३

# आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत श्रेया बराले प्रथम

**वडणगे :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी (बी.ए - भाग ३) श्रेया विश्वास बराले (रा. वडणगे) हिने ४६ किलोखालील वजनीगटात प्रथम क्रमांक मिळविला. तिची ओडिशा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धा साळोखेनगर येथील डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये पार पडल्या. श्रेयाला प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. संतोष कुंडले, अर्चना बराले आदींचे मार्गदर्शन लाभले.


श्रेया बराले